आदिवासी व बिगर आदिवासी क्षेत्रातील ८३४ प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना

जिल्हा : रत्नागिरी

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक:पीएचसी १०८३/३६५६/पीएच्–१६ ब,[रत्नागिरी]
मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.
दिनांक: ३० मार्च १९८५.

संदर्भ :– १] शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक:पीएचसी १०८३/३६५६/पीएच्–१६ ब, दिनांक २ फेब्रुवारी १९८४.

२] संचालक, आरोग्य सेवा, यांचेकडून दिनांक ३० मे १९८४ रोजी क्रमांक: डीएचएस–पीडीई–पीएचसी/८३–८४ डी–७ अन्वये पाठवून देण्यात आलेली तार.

३] शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक: पीएचसी १०८३/३६५६/पीएच्–१६ ब, दिनांक १ ऑगस्ट १९८४.

४] शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग ~~क्रमांक:पीएचसी~~ १०८४/३६५६/पीएच्–१६ ब, दिनांक २८ नोव्हेंबर १९८४.

शासन निर्णय :

शासन निर्णय क्रमांक पीएचसी १०८३/३६५६/पीएच्–१६ ब, दिनांक २ फेब्रुवारी १९८४ व्दारे महाराष्ट्रात ८३४ प्राथमिक आरोग्य केंद्र [७६४ बिगर आदिवासी क्षेत्रात व ७० आदिवासी क्षेत्रात] स्थापन करण्याबाबत मंजूरी आदेश काढण्यात आले होते. या आदेशांना दिनांक ३० मे १९८४ रोजी संचालक, आरोग्य सेवा यांनी तात्पुरती स्थगिती तारेव्दारे दिली होती. शासन निर्णय क्रमांक पीएचसी १०८३/३६५६/पीएच्–१६ ब, दिनांक १ ऑगस्ट १९८४ व समक्रमांकाचा शासन आदेश दिनांक २८ नोव्हेंबर १९८४ याव्दारे एकूण ७४९ प्राथमिक आरोग्य केंद्रावरील तात्पुरती स्थगिती मागे घेण्यात आली होती.

२. वर नमूद केलेल्या शासन आदेशान्वये ज्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची स्थगिती अजूनही मागे घेण्यात आली नाही अशा स्थगित आदेशाबाबत शासनाने आता निर्णय घेतला असून रत्नागिरी जिल्हयातील पुढील प्राथमिक आरोग्य केंद्रांवरील स्थगिती आदेश या शासन निर्णयाव्दारे मागे घेण्यात येत आहेत.

जिल्हा परिषद रत्नागिरी
तारीख 19 APR 1985
...–शाखा
आवक नंबर
तारीख

Health Department. २.
Ratnagiri Zilla Parishad
I. No ... २९८
20 APR 1985

जिल्हा : रत्नागिरी.

| अनुक्रमांक १. | तालुका २. | स्थगिती आदेश मागे घेतलेली प्राथमिक आरोग्य केंद्र |
|---|---|---|
| १] | राजापूर | ओनी |
| २] | चिपळूण | शिरगांव |
| ३] | लांजा | रिंगणे |
| ४] | संगमेश्वर | धामापूर |
| ५] | संगमेश्वर | सायले * |

* मंजूर झालेले हे प्राथमिक आरोग्य केंद्र, कारवले गाव संपून सायले गावाची सुरुवात होत असणा-या ठिकाणी स्थापन करण्यात यावे.

स्थगिती आदेश उठविण्यात आलेली वरील केंद्र कार्यान्वित करण्याचे दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही संचालक, आरोग्य सेवा व जिल्हा परिषद यांनी तावडतोब करावी.

३. त्याचबरोबर रत्नागिरी जिल्ह्यातील स्थगिती आदेश अस्तित्वात असलेल्या पुढील प्राथमिक आरोग्य केंद्राबाबत शासनाने स्थान बदल करून आता ही प्राथमिक आरोग्य केंद्र खाली ठरविल्याप्रमाणे नवीन जागी स्थापन करण्यास मंजूरी दिली आहे :

| अनुक्रमांक १. | तालुका २. | पूर्वीचे स्थान ३. | आता मंजूर करण्यात आलेले स्थान ४. |
|---|---|---|---|
| १] | चिपळूण | खेर्डी | आडरे [चिंचघरी] |
| २] | रत्नागिरी | खेडशी | हातखंबा [तिठा] |

४. संचालक, आरोग्य सेवा, व जिल्हा परिषद यांना याव्दारे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी वर स्तंभ क्रमांक ४ मध्ये नमूद केलेल्या जागी ही प्राथमिक आरोग्य केंद्र तावडतोब कार्यान्वित करावीत.

५. त्याचबरोबर वरील जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्राबाबत अनेक लोक प्रतिनिधींनी व इतरांनी केलेल्या सूचनांचा विचार करून शासनाने पूर्वी मंजूर केलेल्या या जिल्ह्यातील स्थगिती आदेश उठविलेल्या

प्राथमिक आरोग्य केंन्द्रांबाबत पुढील स्थान बदल मंजूर केले आहेत :-

| अनुक्रमांक | पूर्वीचे स्थान | आता मंजूर झालेला स्थान बदल |
|---|---|---|
| १] | दापोली - मुरूड | असूर |
| २] | खेड - कळमणी | आंबवली |

६. संचालक, आरोग्य सेवा व जिल्हा परिषद यांना याव्दारे आदेश देण्यात येत आहेत की, त्यांनी वर स्तंभ क्रमांक २ मध्ये नमूद केलेल्या स्थानाऐवजी स्तंभ ३ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी मंजूर झालेली प्राथमिक आरोग्य केंद्र तातडतोब कार्यान्वित करावीत.

हे आदेश तातडतोब अंमलात आणावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[ ना. ग. पंचपोर ]
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव.

फि/११४८५